जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २७४ - २२ दिनांक १३/०९/२०२२

# रात्रौ घरफोडी चोरी करणा-या सराईत आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक २०/०८/२०२२ रोजी पहाटे ०४.०० वा ते ०६.१५ वा दरम्यान फिर्यादी नामे - विश्वनाथ कृष्णा बेटकर, व्यवसाय- व्यापार, राहणार- रू म नं.०२, वाकीपाडा, खोपरिपाडा काजुप्लॉट रोड, ता. वसई, जि. पालघर यांच्या घरातील सर्व व्यक्ती झोपेत असतांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराच्या मागील खिडकीचे लोखंडी ग्रील उचकटुन स्लायडींगचा लॉक तोडुन खिडकिवाटे घरामध्ये प्रवेश करुन सोन्याचे दागीने रोख रक्कम व मोबाईल असा ६२,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करुन नेले होते. त्याबाबत वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ८३९/२०२२ भा.दं.वि. कलम ३८०, ४५७ प्रमाणे अज्ञात आरोपीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिसरात गेल्या काही महिन्यापासुन रात्रौ घरफोडी चो-याचे प्रमाण वाढीस लागल्याने सदर आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणेबाबत वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी सुचना दिल्या होत्या.

पोलीस उप आयुक्त गुन्हे व सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथकाने सदर गुन्हयाचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून माहिती प्राप्त करुन आरोपीत नामे - १) नक्षत्रधारी राजेंद्र चौव्हाण वय ४३ वर्षे, रा. मौजे - मालजीपाडा, ता. वसई, जि. पालघर. २) कन्हैया राममनोहर यादव वय - ४० वर्षे रा. मौजे - मालजीपाडा, ता. वसई, जि. पालघर. ३) रामरतन रामप्रसाद निशाद वय ३० वर्षे, रा. गावदेवी मंदीरा जवळ, चिचोटी, ता. वसई, जि. पालघर यांना विविध कंपनीचे ३९ स्मार्ट मोबाईल फोन व गुन्हा करणेकरिता वापरत असलेली रिक्षा क्रमांक एम.एच.४७ ए.डी. ३१८३ असा ६,४८,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह अत्यंत कौशल्यपुर्वक मालजीपाडा, ता. वसई येथुन दिनांक १२/०९/२०२२ रोजी शिताफीने ताब्यात घेतले आहे. त्यांचेकडे मिळुन आलेला मुद्देमालाबाबत प्राथमिक तपासात खालील ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

| अ.क्र. | पो.स्टे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे | ८३९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० प्रमाणे. |
| २ | वालीव पोलीस ठाणे | ९०७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० प्रमाणे |
| ३ | वालीव पोलीस ठाणे | ७८४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |
| ४ | पेल्हार पोलीस ठाणे | ५३९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे |

नमुद आरोपीत यांचा पुर्वईतिहास तपासुन पाहता त्यांचेविरोधात विरार पोलीस ठाणे येथे घरफोडीचे २० गुन्हे दाखल असुन उक्त आरोपीत यांना वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ८३९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० या गुन्हयात पुढील कारवाईकरीता वालीव पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले असुन गुन्हयांचा अधिक तपास सुरु आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व. यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, अश्विन पाटील, सुमित जाधव सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

